महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)/शा.नि.-अधिसूचना/०१/२०२६, मुंबई, दि.२८/१०/२०२६

संदर्भ :-महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक. संकीर्ण -३६२६ / प्र. क्र. १७२/E-१८३४४३९/ पोल -३, दि.२१/०९/२०२६

विषय :-राज्यातील पोलीस नियंत्रण कक्षांचे आधुनिकीकरण डायल-११२ प्रकल्पासाठी सल्लागार म्हणून नियुक्त केलेल्या मे. अर्नेस्ट ॲंड यंग या सल्लागार कंपनीस केलेल्या कामाचे देयक अदा करणेबाबत.

****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग शासन निर्णय क्रमांक. संकीर्ण- ३६२६ / प्र. क्र .१७२ / E- १८३४४३९ / पोल-३, दि.२१/०९/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०९२११७०४०२७०२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

अनिता 20/10/2026

(अनिता राठोड)

पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.),

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक १७

प्रत,

विशेष पोलीस महानिरीक्षक, नियोजन व समन्वय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

सहायक पोलीस महानिरीक्षक, नियोजन व समन्वय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके "सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

राज्यातील पोलीस नियंत्रण कक्षांचे आधुनिकीकरण (डायल-११२) प्रकल्पासाठी १९ व्या तिमाही (मार्च, २०२६ ते मे, २०२६) हप्त्यासाठी देयकांची रक्कम अदा करण्यासाठी निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-३६२६/प्र.क्र.१७२/ई-१८३४४३९/पोल-३
गृह विभाग, २ रा मजला,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : २१/०९/२०२६.

<u>वाचा</u> -

१) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,भाग-२,दि.१७.०४.२०१५.
२) केंद्र शासनाचे पत्र क्र.१५०११/१९/२०१६-NERS (PM), दि.१६.०५.२०१७.
३) शासन निर्णय, गृह विभाग क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.६४/विशा-३(अ), दि.०४.०८.२०१७.
४) शासन निर्णय, गृह विभाग क्र. वितंप्र-३६१७/प्र.क्र.११/पोल-३, दि.०४.०९.२०१७.
५) अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दिनांक १४.०८.२०१९ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.
६) अपर पोलीस महासंचालक (नि. व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई व मे. महेंद्रा डिफेन्स सिस्टिम्स लि. यांच्यात दि.११.११.२०१९ रोजी झालेला करार.
७) शासन निर्णय, गृह विभाग क्र. वितंप्र-३६२०/प्र.क्र.२१/पोल-३,दि.०५.०३.२०२०, दि.२८.०८.२०२० व दि.१८.१२.२०२०.
८) शासन निर्णय,गृह विभाग क्र.वितंप्र-३६१७/प्र.क्र.११/भाग-४/पोल-३,दि.२३.०६.२०२१ व दि.२४.११.२०२१.
९) शासन निर्णय, गृह विभाग क्र. वितंप्र-३६१७/प्र.क्र.११/भाग-३/पोल-३, दि.०५.१०.२०२१, दि.१२.०१.२०२३, दि.२२.०२.२०२३ व दि.२७.०२.२०२३.
१०) शासन निर्णय, गृह विभाग क्र.वितंप्र-३६१७/प्र.क्र.११/भाग-८/पोल-३,दि.२९.०३.२०२२ व दि.३१.०३.२०२२.
११) शासन निर्णय, गृह विभाग क्र.वितंप्र-३६१७/प्र.क्र.११/भाग-९/पोल-३,दि.२२.०२.२०२३, व दि.२९.३.२०२३
१२) शासन निर्णय, गृह विभाग क्र.वितंप्र-३६१७/प्र.क्र.११/भाग-१०/पोल-३,दि.३१.०३.२०२३, व दि.२८.७.२०२३
१३) शासन निर्णय, गृह विभाग क्र.वितंप्र-३६१७/प्र.क्र.११/भाग-६/पोल-३,दि.४.९.२०२३
१४) शासन निर्णय, गृह विभाग क्र.वितंप्र-३६१७/प्र.क्र.११/भाग-६/पोल-३,दि.३१.०३.२०२३, व दि.१.११.२०२३ आणि दि.२३.१.२०२४.
१५) शासन निर्णय, गृह विभाग क्र.वितंप्र-३६१७/प्र.क्र.११/भाग-११/पोल-३,दि.५.३.२०२४, व दि.३०.३.२०२४ व दि.९.१२.२०२४, दि.३१.३.२०२५ व दि. २८.०४.२०२५
१६) शासन निर्णय, गृह विभाग क्र.संकीर्ण-३६२५/प्र.क्र.११०/भाग-११/पोल-३,दि.२५.११.२०२५.
१७) शासन निर्णय, गृह विभाग क्र.संकीर्ण-३६२५/प्र.क्र.१९१/पोल-३, दि. २७.०१.२०२६, दि.२४.०२.२०२६ व दि.३१.०३.२०२६.

१८) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र२०२.अर्थसं.६४.क्र.प्र/०.दि ,३-पोल/०९.०४.२०२६.

१९) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयाचे पत्र क्र.पोमसं/१७/६१६२/ डायल-११२ प्रकल्प/ERSS २.०/८१/२०१७-२०२५,दि.१२.०८.२०२६.

२०) उच्च स्तरीय समितीच्या दि. २५.०८.२०२६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

<u>प्रस्तावना</u>

राज्यातील नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत पोलीस सेवा उपलब्ध करून देण्यासाठी राज्यातील पोलीस नियंत्रण कक्षांचे आधुनिकीकरण करण्याकरिता संदर्भाधीन शासन निर्णय क्र.४ नुसार प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि.१४.०८.२०१९ रोजीच्या बैठकीत रु.४०४,४४,६१,५१९/- (चारशे चार कोटी चव्वेचाळीस लाख एकसष्ठ हजार पाचशे एकोणीस फक्त) इतक्या प्रकल्प खर्चासह मे.महेंद्रा डिफेन्स सिस्टम्स लि. यांना Letter of Intent (LOI) निर्गमित करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला. त्याअनुषंगाने राज्यातील पोलीस नियंत्रण कक्षांचे आधुनिकीकरण (डायल-११२) प्रकल्पाकरिता अपर पोलीस महासंचालक (नि. व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई व मे. महेंद्रा डिफेन्स सिस्टम्स लि. याच्यांत करार करण्यात आला आहे. डायल-११२ प्रकल्पांतर्गत देयके अदा करण्याकरिता आतापर्यंत संदर्भ क्र.७ ते १७ येथील शासन निर्णयान्वये निधी वितरित करण्यात आला आहे.

२. डायल-११२ प्रकल्पाचे प्रकल्प सेवा पुरवठादार मे. महिंद्रा डिफेन्स सिस्टिम्स् लि. यांनी डायल-११२ प्रकल्पाच्या अंमलबजावणीसंदर्भात १९ व्या तिमाहीचे (मार्च, २०२६ ते मे, २०२६ या कालावधीचे) रू. १३,५०,४६,२३८.८३/- इतक्या रकमेची पुढीलप्रमाणे देयके सादर केली असून त्यांचा तपशील पुढीलप्रमाणे :-

Sr. No.	Payment Milestone	Invoice Amount (Incl.GST)
१	*२*	*३*
१	Opex Invoices for Quarter १९ (March २०२६ - May २०२६)	७,००,४०,०९६.५९/-
२	Capex १.५% Quarter १९ payment (March २०२६ - May २०२६)	२,९७,८१,९७०/-
३	Opex ९ Call Centre Resources Invoices for Quarter १९ (March २०२६ - May २०२६)	३,५२,२४,१७२.२४/-
Total A+B+C		**१३,५०,४६,२३८.८३/-**

३. डायल-११२ प्रकल्पाचे प्रकल्प पुरवठादार मे. महिंद्रा डिफेन्स सिस्टिम्स् लि. यांनी सादर केलेल्या देयकांची पडताळणी प्रकल्पाचे प्रकल्प सल्लागार M/s. E & Y यांनी केली. मे. महिंद्रा डिफेन्स सिस्टिम्स् लि. यांनी सादर केलेल्या देयकांच्या एकूण रक्कम रू. १३,५०,४६,२३८.८३/- इतक्या रकमेतून SLA मधील तरतुदीनुसार दंडनीय शुल्क रू.७,३१,३५५.०४/- व अतिरिक्त रक्कम रू.८.६६/- कपात करून रू. १३,४३,१४,८७५.१३/- इतकी रक्कम अनुज्ञेय असल्याचे प्रकल्प सल्लगार यांनी कळविले आहे. त्यानुसार मे. महिंद्रा डिफेन्स सिस्टिम्स् लि. यांना १९ व्या तिमाहीकरिता (मार्च, २०२६ ते मे, २०२६ या कालावधीकरिता) रू. १३,४३,१४,८७५/- इतकी रक्कम अदा करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दि. १२.०८.२०२६ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर केला आहे.

४. अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि. २५.०८.२०२६ रोजीच्या बैठकीत डायल-११२ प्रकल्पाचे प्रकल्प पुरवठादार मे. महिंद्रा डिफेन्स सिस्टिम्स् लि. यांना १९ व्या तिमाहीकरिता (मार्च, २०२६ ते मे, २०२६ या कालावधीकरिता) डायल-११२ प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरिता एकूण रू.१३,४३,१४,८७५/- इतक्या रकमेची देयके अदा करण्यास मान्यता देण्यात आली.

५. उपरोक्त बाब विचारात घेता, डायल -११२ या प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरिता १९ व्या तिमाही (मार्च, २०२६ ते मे, २०२६) करिता मे. महिंद्रा डिफेन्स सिस्टिम्स् लिमिटेड यांची रू.१३,४३,१४,८७५/- इतक्या रकमेचे देयक अदा करण्यास मान्यता देऊन निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णय</u>

पोलीस नियंत्रण कक्षांचे आधुनिकीकरण (डायल-११२) प्रकल्पाचे पुरवठादार मे.महेंद्रा डिफेन्स सिस्टम्स लि. यांनी १९ व्या तिमाहीचे (मार्च, २०२६ ते मे, २०२६) या कालावधीची सादर केलेल्या रू. १३,५०,४६,२३८.८३/- इतक्या रकमेतून SLA मधील तरतुदीनुसार पडताळणी करून सदर देयकामतून दंडनीय शुल्क रू.७,३१,३५५.०४/- व अतिरिक्त रक्कम रू.८.६६/- कपात करून उर्वरित रू.१३,४३,१४,८७५.१३/- म्हणजेच पुर्णाकांत **रू. १३,४३,१४,८७५/- (रू. तेरा कोटी त्रेचाळीस लाख चौदा हजार आठशे पंच्याहत्तर फक्त) इतक्या रकमेची देयके अदा करण्यास याद्वारे मंजुरी** देण्यात येत आहे.

२. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी मे.महेंद्रा डिफेन्स सिस्टम्स लि. यांची उक्त रकमेची देयके अदा करताना प्रचलित कर वजाती करून अदा करण्यात यावीत.

३. प्रस्तुत प्रकरणी उपरोक्त प्रमाणे होणारा खर्च "मागणी क्र.बी-१, २०५५- पोलीस (००) ११५, पोलीस दलाचे आधुनिकीकरण (०१) (०५) डायल-११२ प्रकल्प (कार्यक्रम) (२०५५ ए२७५), ५२ यंत्रसामुग्री व साधनसामुग्री," या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०२६-२७ या वित्तीय वर्षासाठी उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदरहु निधी आहरित करण्यासाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना नियंत्रण अधिकारी व त्यांच्या अधिनस्त आहरण व संवितरण अधिकाऱ्याला आहरण व संवितरण अधिकारी म्हणुन घोषीत करण्यात येत आहे. तसेच त्यांनी उपरोक्त निधी आहरित करुन MAHINDRA DEFENCE SYSTEMS LTD या कंपनीच्या २०९-२१४, Kailash Building २६, Kasturba Gandhi Marg, New Delhi-११०००१ येथील HDFC बँकेच्या शाखेचे खाते क्र.०००३०३१००१४८०० (IFSC Code - HDFC०००००३) या खात्यावर जमा करावा.

५. सदर शासन निर्णय, वित्त विभाग शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम, भाग-२, दि.१७.०४.२०१५ मधील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८,भाग-पहिला, उपविभाग-दोन, महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम, १९६५ व अ. क्र. २७ अ नियम क्र. ७६ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार प्रशासकीय विभागाला असलेल्या अधिकारानुसार, उच्च स्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि. २५.०८.२०२६ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार तसेच शासन परिपत्रक, वित्त विभाग दि.०९.०४.२०२६ अनुसार वित्त विभागाने अनौपचारीक संदर्भ क्र.५३९/२०२६/व्यय-७ दि.०७.०९.२०२६ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार सन २०२६-२७ या वित्तीय वर्षात निधी वितरणास दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०९२११७०५४३२७२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

NAGNATH
RAMCHANDRA JADHAV

Digitally signed by NAGNATH RAMCHANDRA JADHAV
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Home Department, 2.5.4.20=13C3ACFAE7FC8126CE285621D58425C075E0F60C5F67596D7F7181EA8CC9011E, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=43D41039958F4FA2CBAEB247FAE932CC6267D47DE282ACE9AEFCEA0F0CAC955E, cn=NAGNATH RAMCHANDRA JADHAV
Date: 2026.09.21 17:06:27 +05'30'

(नागनाथ रा. जाधव)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मुख्य सचिव यांचे सहसचिव, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव (विशेष) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
७. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. अपर पोलीस महासंचालक, नि. व स., महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
१०. महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
११. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१३. मे. महेंद्रा डिफेन्स सिस्टिम्स लि., अंधेरी पुर्व, मुंबई.
१४. वित्त विभाग, व्यय-७/वित्तीय सुधारणा, मंत्रालय, मुंबई.
१५. अर्थसं-१/गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. रोख शाखा/गृह विभाग, मंत्रालय, मुंबई. / निवडनस्ती, पोल-३.